सं. फौजदारी खटला क्र. <u>६००/२०२४</u>
योगेश विरूद्ध गजानन
**निशाणी १८ खाली**

**<u>फिर्यादी पक्षातर्फे साक्षीदार क्र. १ योगेश रमेशराव गव्हाळ याची उर्वरित सरतपासणी शपथेवर सुरू — फिर्यादी तर्फे ॲड श्री. आर. व्ही. कुळकर्णी यांचे मार्फत —</u>**

प्रस्तुत प्रकरणी मी माझे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र निशाणी १८ खाली दाखल केले असुन त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. मी आरोपीला ओळखतो. आरोपीला घर बांधाकामासाठी मी विटा पुरवल्या होत्या. आरोपीला मी सदर विटा एक दोन महिन्याच्या उधारीवर पुरवल्या होत्या. मी आरोपीला ११००० विटा पुरवल्या होत्या. आरोपीकडुन मला रू. ५२,६००/— येणे होते. आरोपीने मला केवळ रू.११,५००/— दिलेले होते. आरोपीने मला उर्वरित रक्कम रू.४१,१००/— एक दोन महिन्यानंतर देण्याचे कबुल केले होते. दोन महिन्यानंतर मी आरोपीच्या घरी गेलो परंतु आरोपी भेटला नाही. त्यानंतर आरोपीने मला रू.४१,०००/— चा धनादेश दिला. सदर मुळ धनादेश मी अभिलेखावर दस्त यादी निशाणी १७ वर दाखल केला आहे. आता मला सदर धनादेश दाखवला. हाच तो धनादेश आहे. सदर धनादेशाला **निशाणी २२** देण्यात येते. सदर धनादेश मी माझ्या बॅकेच्या खात्याद्वारे वटवण्यासाठी टाकला परंतु सदर धनादेश आरोपीच्या खाती पुरेशी रक्कम शिल्लक नाही या कारणाने मेमोसह परत आला. सदर मुळ मेमो मी अभिलेखावर दाखल केला आहे. त्यावर संबंधीत बॅकेच्या अधिका—याची सही व बॅकेचा शिक्का आहे. सदर मेमोस **निशाणी २३** देण्यात येते. त्यामुळे मी आरोपीला विचारणा केली परंतु तो मला उत्तर देत नव्हता म्हणुन मी आरोपीला

वकिलांमार्फत नोटीस पाठवली. सदर नोटीसची स्थळप्रत मी अभिलेखावर दाखल केली आहे. त्यावर माझी व माझे वकिलांची सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. सदर नोटीसच्या स्थळप्रतीस **निशाणी २४** देण्यात येते. सदर नोटीस निशाणी २४ आरोपीला पाठवल्याबाबत नोंदणीकृत पोस्ट दाखल्याने पाठवल्याबाबत मुळ पावती मी अभिलेखावर दाखल केली आहे. त्यास **निशाणी २५** देण्यात येते. नोटीस निशाणी २४ आरोपीला प्राप्त झाल्याबाबत पोस्टाची मुळ पोहच पावती मी अभिलेखावर दाखल केली आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यावर आरोपीची सही आहे. त्यास **निशाणी २६** देण्यात येते.

**( फिर्यादीतर्फे तोंडी विनंतीवरून उर्वरित सरतपास पुढील तारखेपावेतो तहकुब )**

समक्ष व श्रवणोत्तर स्वीकृत.

**स्वा/—**

दि. ०७.०१.२०२६ (ए.ए. माळी)

अकोट न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,

(न्यायालय क्र. २)

अकोट, ता. आकोट, जि. अकोला.